अनुसूचित जमाती अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय जाती कल्याण व शारिरीक आणि मानसिक-दुष्टया अपंग, कुष्ठरोगी, वगैरेंसाठी व समाजकल्याण क्षेत्रात मौलिक कार्य करणाऱ्या राज्यातील सामाजिक कार्यकर्त्यांना/ संस्थांना "दलित मित्र" पुरस्कार देण्याची योजना ...

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
शासन निर्णय क्र. एससीडब्ल्यू-१०८८/१५५५/[२१६]/मावक-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: २० फेब्रुवारी, १९८९.

वाचा:- १] शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग, क्र. एससीडब्ल्यू-१०७१/३८३६६/जे, दिनांक ४. ५. १९७१.

२] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. एससीडब्ल्यू-१०८१/३९७२७/के. नं. ३५८/का. ३२, दिनांक १७. ९. १९८१.

३] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. एससीडब्ल्यू-१०८५/१८९८६/[२११]/बीसीडब्ल्यू-४, दिनांक १९, १२. १९८६.

४] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. बीसीडब्ल्यू-१०८८/१५५५/[२१६]/मावक-४, दिनांक २४. ६. १९८८.

५] शासन शुध्दीपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. बीसीडब्ल्यू-१०८८/१५५५/[२१६]/मावक-४, दिनांक ११. ७. १९८८.

शासन निर्णय:- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय जाती कल्याण व शारिरीक आणि मानसिकदुष्टया अपंग कुष्ठरोगी वगैरेंसाठी व समाजकल्याण क्षेत्रात मौलिक कार्य करणाऱ्या राज्यातील सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव करावा व सामाजिक क्षेत्रात काम करीत असलेल्या समाजसेवकाच्या कामाची दाद द्यावी व इतर कार्यकर्त्यांना त्यापासून प्रेरणा मिळावी जेणेकरुन सामाजिक उत्थानासाठी कार्यकर्ते सरसावून पुढे यावेत यासाठी शासनाने १९७१-७२ पासून "दलित मित्र" पुरस्कार योजना सुरु केलेली असून सामाजिक कार्यकर्त्यांना "दलित मित्र" हा पुरस्कार दिलेला आहे. शासनाने



Scanned with CamScanner

६८

नियम आणि त्यासाठी करावयाच्या वर्गाची प्रमाण पद्धती व वर्गाचा तपशील सोबतच्या विवरण "अ" "ब" व "क" मध्ये दर्शविली आहे.

२. ... संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, ... अधिकारी म्हणून घोषित ... येत आहे.

... मागणी क्र. ... "२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर ... ०३ ... -इतर ... इतर ... स्थानिक संस्थांना अनुदान [२२२५०२९६] मागणी ... खर्च भागवून ...

... सदर निर्णय ... विभागाच्या मान्यतेने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ... दि. १३.२.८९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(... र. आजगांवकर)
... सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व समाजकल्याण अधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
जिल्हा कोषाधिकारी, पुणे, जि. पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क,
निवड नस्ती, का-मावक-५.

Scanned with CamScanner

९५ ९५४

## विवरण पत्र "अ"

सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या समाज सेवकांना/संस्थांना "दलित मित्र" ह्या राज्य पुरस्कारासाठी नियम

संक्षिप्त शिर्ष आणि व्याप्ती — ह्या नियमांना सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी "दलित मित्र" राज्य पुरस्कार, नियम असे संबोधण्यात यावे. त्यापुढे "पुरस्कार" असे नमूद केले आहे. हे नियम राज्यातिल सर्व जिल्ह्यासाठी लागू राहतील.

उद्दिष्ट — सामाजिक क्षेत्रात काम करीत असलेल्या समाज सेवकांच्या/सामाजिक संस्थांच्या कामाची दाद घ्यावी व इतर कार्यकर्त्यांना त्यापासून प्रेरणा मिळावी जेणेकरून सामाजिक उत्थापनासाठी कार्यकर्ते सरसावून पुढे यावेत.

१] सामाजिक कार्याचे स्वरूप — या योजनेनुसार समाजकल्याण क्षेत्रात म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जातीचे कल्याण तसेच शारिरीक व मानसिकदृष्टया मनोदुर्बल, अपंग, कुष्टरोगी इत्यादीचे समाजातील दुर्बल घटकाचे कल्याणासाठी झटणारे नामवंत समाज सेवक व सामाजिक संस्था असाव्यात.

२] पुरस्कार — पुरस्कार पुढीलप्रमाणे राहील :-

दलित मित्रांसाठी

१]शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र

२]३,००१ रुपये रोख रक्कम[रुपये तीन हजार एक]

३]एक शाल किंवा साडी व खण म्हणजेच चोळकापडे कापड आणि श्रीफळ [नारळ]

सामाजिक संस्थासाठी

१]शासनाने रितसर मान्यता दिलेले सन्मानपत्र

२]स्मृती चिन्ह ज्यांवर संस्थेचे नांव असेल

३]रुपये१०,००१/-[रु.दहा हजार एक फक्त] मार्यादा रोख रक्कम

Scanned with CamScanner

पात्रता

१]या योजनेनुसार समाजकल्याण क्षेत्रात म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, भटक्या व विमुक्त जातीचे कल्याण कार्य तसेच शारिरीक व मानसिकदृष्टया मनोदुर्बल, अपंग कुष्ठरोगी इत्यादी व सामाजिक दुर्बल घटकांचे कल्याणासाठी झटणारे [illegible] असावेत.

२]सामाजिक [illegible] पंधरा[१५] वर्षे कार्य केलेले असावे.

३]पुरस्कार देताना अथवा सामाजिक कार्यकर्त्यांचे वय खालीलप्रमाणे असावे.

<u>पुरुष ५० वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त</u>

<u>स्त्रिया ४० वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त</u>

अपवादात्मक प्रकरणी वरील वय शिथील करण्याचे अधिकार शासनाने यासाठी नियुक्त केलेल्या समितीकडे राहातील.

४]कोणत्याही व्यक्तीस त्याच्या आयुष्यात एकापेक्षा अधिक वेळा पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

५]हा पुरस्कार मिळण्यास जात, धर्म, लिंग, क्षेत्र ह्या गोष्टींचा विचार केला जाणार नाही.

६]पुरस्कार मिळण्यास आमदार/खासदार/जिल्हा परिषदे सभासद किंवा कोणताही पदाधिकारी पात्र असणार नाही.

<u>सामाजिक संस्थांसाठी</u>

१]समाजकल्याण क्षेत्रात मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्याय निर्मुलन, अंधश्रध्दा रुढी निर्मुलन, जनजागरण इत्यादी क्षेत्रात कार्य करणा-या सामाजिक संस्थांना हा पुरस्कार दिला जाईल.

२]स्वयंसेवी संस्था, पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० व/वा सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट अनुसार पंजीबध्द असावी.

३]स्वयंसेवी संस्थेचे वरील क्र. १ मध्ये दर्शविलेले समाज कल्याण क्षेत्रातील सेवा व कार्य १० वर्षाहून अधिक असावे विशेष मौलिक व भरीव काम करणा-या संस्थांच्या बाबतीत अट अपवाद म्हणून शिथिल करण्यात येईल.

Scanned with CamScanner

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची व सामाजिक संस्थांची निवड करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : दमिपु २००१/प्र.क्र.१८६/मावक-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ जुलै,२००१.

वाचा :- १) शा.नि.समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व पर्यटन विभाग क्र.एससीडब्ल्यु १०८६/१५५५/२१६/मावक ४, दि. ३० फेब्रुवारी,१९८९
२) शा.नि.समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र.दमिपु २०००/प्र.क्र.२१३//मावक ४, दि. १० एप्रिल, २०००

**शासन निर्णय :-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती तसेच इतर मागासवर्गीयांचे कल्याणासाठी व शारीरिक आणि मानसिकदृष्टया अपंग, कुष्ठरोग अशा पिडीत, दुर्लक्षित , कमकुवत व गरजुंची निष्ठेने सेवा व सामाजिक क्षेत्रात मौलिक कार्य करणाऱ्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा व सामाजिक संस्थांचा त्यांच्या विधायक कार्याबद्दल दरवर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्काराने यथोचित गौरव केला जातो.

२. आतापर्यंत २०००-२००१ या वर्षापर्यंत निवड करुन पारितोषिक वितरण समारंभ पार पाडण्यात आलेला आहे. सन २००१-२००२ या वर्षाकरीता व्यक्तींची / संस्थांची निवड करण्याबद्दलचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर विचार करुन या योजनेंतर्गत परिशिष्ट "अ" मध्ये नमूद करण्यात आलेल्या ५१ व्यक्तींची डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कारासाठी सन २००१-२००२ करीता निवड करण्यात आलेली आहे.

३. सदरहू योजनेखाली सेवाभावी संस्थांना पुरस्कार प्रदान करण्याकरीता परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेल्या १० संस्थांची निवड सन २००१-२००२ करीता करण्यात आलेली आहे.

४. सदरहू योजनेंतर्गत यापुढे दरवर्षी पुरस्काराकरीता ५१ व्यक्ती व १० संस्थांची निवड करण्यात येईल. निवड केलेल्या व्यक्तींला यापुढे दरवर्षी रु.१५,००१/- एवढया रकमेचे रोख पारितोषिक व संस्थेला रु.२५,००१/- एवढया रकमेचे रोख पारितोषिक देण्यात येईल.

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्थांचे प्रतिनिधी यांना पुरस्कार वितरण समारंभाच्या कालावधीत तीन दिवसांकरीता शासकीय पाहुणे म्हणून समजण्यात येतील.

६. सहपत्रातील "डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कारा " करिता निवड केलेल्या व्यक्तींची / संस्थांची नावे महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये (सर्वसाधारण भाग ) प्रसिध्द करण्यात यावी. सदर व्यक्तींना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाने करावी व त्याप्रमाणे संबंधितांना कळवावे.

७. सदर पुरस्कार प्राप्त व्यक्तींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे मोफत प्रवासाची सवलत देण्यात येते. त्यासंदर्भात संबंधित विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी उचित कार्यवाही करावी.

८. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर पुरस्कार प्राप्त व्यक्तींसाठी शासकीय विश्रामगृहात सवलतीच्या दराने उचित प्राथम्यक्रम देऊन आरक्षणासाठी संबंधितांना योग्य त्या सूचना द्याव्यात.

९. संचालक, समाजकल्याण, पुणे यांना सन २००१-२००२ या वर्षाकरिता मंजूर केलेल्या लेखाशीर्षामधून याबाबतचा खर्च करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. होणारा जादाचा खर्च एकूण तरतूदी मधून आठमाही अंदाजात वाढवून घेण्याची कार्यवाही संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी करावी.

१०. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५३२/२००१/व्यय १४, दिनांक १८.७.२००१ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नं.मा.शिलवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक,समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी / सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे व नागपूर
सामान्य प्रशासन विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग / गृह विभाग (परिवहन)
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई / इतर सर्व मंत्रालयीन विभाग,
महासंचालक , माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
निवड नस्ती - मावक ४.

711C

## विवरण पत्र "क"

### "दलित मित्र राज्य पुरस्कारासाठी करण्यांत यावयाच्या खर्चाच्या अंदाजाचे विवरण पत्र

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १] | रोख मानधन | ४० | रु. ३,००१/- प्रत्येकी | १,२०,०४०/- |
| २] | दलित मित्रांसाठी वुलनची शाल व किंवा साडी [बाऊंचे कापड खण] | ४० | रु. २२५/- प्रत्येकी | ९,०००/- |
| ३] | दलित मित्रांच्या पत्नी/साठी सिल्क शाल/किंवा पतीसाठी साधी वुलन शाल | ४० | रु. ५०/- प्रत्येकी | २,०००/- |
| ४] | प्रमाणपत्र.. भिंतीपत्रे पुस्तिका छपाई आणि साधनसामुग्री | — | — | २,०००/- |
| ५] | ८० व्यक्तींचा प्रवासभत्ता [प्रत्येकी रु. २५०/- प्रमाणे] | — | — | २०,०००/- |
| ६] | ८० व्यक्तींचा ३ दिवसांचा राहण्याचा व जेवण्याचा खर्च | — | — | ३०,०००/- |
| ७] | श्रीफळ [नारळ] [८० जणांना] | दलितमित्र व त्यांचे पती/पत्नी यांना प्रत्येकी एक | रु. ४/- प्रत्येकी नारळाला | ३२०/- |
| ८] | संकिर्ण उदा. डेकोरेशन, स्थानिक व प्रेक्षणीय स्थळांचा प्रवास खर्च, सभागृह पुष्पहार, इत्यादी. | | | १०,०००/- |
| | | | एकूण | १,९३,०००/- |
| | | | रक्कम पूर्ण आकड्यात | १,९३,०००/- |
| | | | | [१,९५,०००/- ] |

आर जी.

Scanned with CamScanner

समाज कल्याण संचालनालय
पुणे - १.
९९८
२८।४।१०

डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलीत मित्र पुरस्कार. स्मृतीचिन्हाच्या रकमेत वाढ करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : बीसीएच-२००९/प्र.क्र.१०८/मावक-७
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ मे,२०१०

वाचा: १ शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.एससीडब्ल्यु-१०८६/१५५५/(२१६) /मावक-४, दिनांक : २० फेब्रुवारी, १९८९.

२ शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. बीसीएच-१०९७/प्र.क्र.२३६/मावक-४, दिनांक : २९/७/१९९७.

३ संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.सकसं/मावक/दमीपु/ कार्य/ ०९-१०/ कार्या.१२/३७६, दिनांक :२८ मार्च, २०१०

४ शासन शुध्दीपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००९/ प्र.क्र.१०८ / मावक-७, दिनांक २०/३/२०१०

**<u>प्रस्तावना :-</u>**

संदर्भाधीन अ.क्र.२ येथील शासन निर्णयान्वये दलीत मित्र पुरस्कार योजने अंतर्गत प्रत्येक पुरस्कारार्थी व्यक्ती व संस्था यांच्या स्मृतीचीन्हासाठी अनुक्रमे रु.१८००/- व रु. २१००/- इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. सदरहू रक्कम डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलीत मित्र पुरस्कार व अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी देण्यात येते. अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी स्मृतीचिन्हाच्या रकमेत उपरोक्त शासन निर्णय दिनांक २० मार्च, २०१० अन्वये वाढ करुन व्यक्ती व संस्थेसाठी अनुक्रमे रु.३,५००/- व ४,०००/- इतकी करण्यात आली आहे. दलीत मित्र पुरस्कारासाठी पुस्कार प्राप्त व्यक्ती "स्मृतीचिन्ह सन्मानपत्रासह" व "पुरस्कारार्थी संस्थांना समृतीचिन्ह, सन्मानपत्रासह,"रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

१२
१।४।१०

**<u>शासन निर्णय:-</u>**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलीत मित्र पुरस्कार. स्मृती चिन्हाच्या रकमेत खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | तपशिल | स्मृतीचिन्हांची रक्कम (सन्मान पत्रासह) | |
|---|---|---|---|
| | | दिनांक २९/७/१९९७ प्रमाणे | सुधारीत |
| १ | प्रत्येक व्यक्तीसाठी | रु.१,८००/- | रु.३,५००/- |
| २ | प्रत्येक संस्थेसाठी | रु.२,१००/- | रु.४,०००/- |

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर दर्शविण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००५२६१७४६०२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सदाशिव सं. बेनके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ संचालक, समाज कल्याण,संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२ महालेखापाल,महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
३ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
४ निवड नस्ती, मावक-७, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

" डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार" हे नाव बदलून "डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार" असे करणेबाबत.

---

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: बीसीएच-२०१२/प्र.क्र.४७/बांधकामे
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २ एप्रिल, २०१२.

वाचा :- १) शासन निर्णय शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग क्र. एससीडब्ल्यू-१०७१/३८१६६/जे, दिनांक ४.५.१९७१.

२) शासन निर्णय , समाजकल्याण, सास्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, एससीडब्ल्यू-१०८१/३९७२७/के.नं. ३५८/का-३२, दिनांक १७.९.१९८१.

३) शासन निर्णय, समाजकल्याण, सास्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग क्र. एससीडब्ल्यू-१०८५/१९९८६/२११/बीसीडब्ल्यू-४, दिनांक १९.१२.१९८६

४) शासन निर्णय, समाजकल्याण, सास्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग क्र.एससीडब्ल्यू-१०८५/१८१८६/२११/बीसीडब्ल्यू-४, दिनांक २४,६,१९८८.

५) शासन निर्णय क्र:- एससीडब्ल्यू-१०८६/१५५५/(२१६)/मावक-४ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.दिनांक ;- २० फेब्रुवारी, १९८९

शासन निर्णय :-

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गी जाती कल्याण व शारीरीक आणि मानसिकदृष्टया, अपंग कुष्ठरोगी वगैरेसाठी व समाजकल्याण क्षेत्रा मौलिक कार्य करणा-या राज्यातील सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव करावा व सामाजिक क्षेत्रात का करीत असलेल्या समाज सेवकाच्या कामाची दाद ध्यावी व इतर कार्यकर्त्यांना त्यापासून प्रेरणा मिळा जेणेकरून सामाजिक उत्थानासाठी कार्यकर्ते सरसावून पुढे यावेत यासाठी शासनाने १९७१-७२ पास "दलित मित्र " पुरस्कार योजना सुरू केलेली आहे. सामाजिक क्षेत्रात काम करणा-या व्यक्तीं ज्याप्रमाणे शासन "दलित मित्र" पुरस्कार देऊन गौरविले जाते त्याचप्रमाणे या क्षेत्रात उल्लेखनं काम करणा-या स्वयंसेवी सामाजिक संस्थांनासुध्दा "दलित मित्र" पुरस्कार देण्याबाबत १९८९ पार सुरूवात केलेली आहे.

व्यक्ती व संस्थांना देण्यात येणाऱ्या सदर पुरस्कार योजनेच्या नावामध्ये " डॉ.बाबासा आंबेडकर दलित मित्र पुरस्कार " या ऐवजी "डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार" अ बदल करण्यात येत आहे

e0
3/4/2012

D:\BCW-VII\G\ 183/45

Scanned with CamScanner

E4

२. सदर पुरस्कारासंदर्भातील नियम व अटी तसेच पुरस्कारासाठी करावयाच्या खर्चाची प्रमाण पध्दती पुर्वीप्रमाणेच राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला असून त्याचा संगणक क्रमांक २०१२०४०२१२४३१३४१३००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दिनेश वाघमारे)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण विभाग, पुणे
सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क,
निवडनस्ती, सामाजिक न्याय विभाग, कार्यासन बांधकामे

पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड

Scanned with CamScanner

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार या पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रसिद्धी- २०२५/प्र.क्र.०८ /समन्वय

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- ०४ मार्च, २०२५

वाचा:- १. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. दमिपु-२००१/ प्र.क्र.१८६/मावक-४ दि.२५.०७.२००१

२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. संरपु-२००४/ प्र.क्र.१८४/ मावक-४ दि.१६.०७.२००४

३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. दागापु-२००४/ प्र.क्र.५९/ मावक-१ दि.०७.०८.२००४

४. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. असापु-२००१/ प्र.क्र.१०५/ मावक-७ दि.२२.०६.२०१०

**प्रस्तावना:-**

सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणुन दरवर्षी १) डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, २) संत रविदास पुरस्कार ३) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार ४) कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार असे पुरस्कार देण्यात येतात. सदर पुरस्कारांच्या रक्कमेत बऱ्याच कालावधीपासून वाढ करण्यात आलेली नसल्याने विविध लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संस्था यांचेकडून पुरस्काराच्या रक्कमेत वाढ करण्याची मागणी करणात येत होती त्यानुषंगाने सदर पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

१. सामाजिक न्याय विभागामार्फत विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सदर पुरस्कार रक्कमेत सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुरस्कारांबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या धोरणाचा अवलंब करणे आवश्यक राहिल.

३. सदर शासन निर्णय सन २०२४-२५ या वित्तीय वर्षापासून घोषित करण्यात येणाऱ्या पुरस्कारांना लागु राहिल.

४. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च संबंधित लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागवण्यात यावा.

५. प्रस्तुत प्रकरणी आयुक्त समाज कल्याण, पुणे यांना नियंत्रक अधिकारी व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ /विनियम/ भाग-२ ,दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकिय विभागास असलेल्या अधिकारात अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-:- अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दिनांक ०४.०४.२०२२,शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक १२, फेब्रुवारी २०२५, शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दिनांक १, एप्रिल २०२४, शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३ दिनांक २५, जुलै २०२४, मधील सर्व परिच्छेद व परिष्ठातील अटी नुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी आयुक्त, समाज कल्याण ,पुणे यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२५०३०४१४१०२१५८२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNITA VIRENDRA GAIKWAD

Digitally signed by SUNITA VIRENDRA GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=ad31fff5a72bcd0471a184e5d4be4b75ca3248052d0eb588b97308bad1ac67a40, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7B3D0DDAE7B5F68C71F56026F5D7EB976A590FFF12E613DAC6FD709B6CB01646, cn=SUNITA VIRENDRA GAIKWAD
Date: 2025.03.04 14:12:46 +05'30'

(सुनिता गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई
३. मा. मंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/परिषद, विधानमंडळ, मुंबई
५. मा. राज्यमंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे
९. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
१०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय.
१२. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग.
१५. सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण विभाग
१६. सर्व संबंधित व्यक्ती / संस्था.
१७. निवडनस्ती (समन्वय).

# प्रपत्र

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | लेखाशिर्ष | पुरस्काराची संख्या | | सद्या अस्तित्वात असलेली पुरस्कार रक्कम (रूपये | | सुधारित पुरस्कार रक्कम (रूपये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | व्यक्ती | संस्था | प्रतिव्यक्ती | प्रतिसंस्था | प्रतिव्यक्ती | प्रतिसंस्था |
| १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार | २२२५-०९९६ | ५१ | १० | १५,००० | २५,००१ | ७५,००० | १,००,००० |
| २ | संत रविदास पुरस्कार | २२२५-०९९६ | ०१ | ०१ | २१,००० | ३०,००१ | ५१,००० | १,००,००० |
| ३ | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार | २२२५-०९९६ | २५ | ०६ | २५,००० | ५०,००० | ५१,००० | १,००,००० |
| ४ | कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार | २२२५-३१२६ | ०१ | ०१ | ५१,००० | ५१,००० | ५१,००० | १,००,००० |

****************************************************************************************